# नवे रूप, नव्या आशा

**काळ कूस बदलतो आणि शेवटच्या पानासह वापरून जीर्णशीर्ण झालेले कॅलेंडर भिंतीवरून दूर होते. नवे वर्ष जुन्या वर्षाला शेवटचा धक्का देऊन आपल्यासमोर नवी उमेद, नवे संकल्प, नव्या आशा घेऊन हसतमुखाने उभे राहते! भूतकाळात काय रमता, चला भविष्याकडे, असाच जणू नव्या वर्षाचा सांगावा असतो. माघारीची ओढ नको, पाऊल पुढेच पडू द्या... नवे वर्ष सांगत राहते. पण माणूस हा भूतकाळात, स्वप्नरंजनात रमणारा प्राणी, त्याचा पाय जडच राहतो. पुढे जाण्याऐवजी थोडेसे रेंगाळावे, सावकाशीने वाटचाल करावी असाच त्याचा कल राहतो. तो गतवर्षाचा आढावा घेत राहतो. त्याला सिंहावलोकन असेही गोंडस नाव आहे. अगदी पहिला महिना संपेस्तोवर जुन्या वर्षाच्या आठवणी त्याच्या मनात रुंजी घालत राहतात. भविष्याला भूतकाळाचा पाया आणि वर्तमानाचा आधार लागतो हे खरे आहे, पण म्हणून भूतकाळालाच किती काळ आपले आयुष्य व्यापू द्यायचे हे केव्हा तरी ठरवावे लागेल. अनेकांना हे भान नसते. म्हणूनच ते काळसुसंगत राहात नाहीत, त्यांचे विचार जुन्याच काळात अडकून पडतात. विचारसरणीपासून ते शेतीतल्या तंत्रापर्यंत सर्वत्र हे सूत्र लागू पडते. गेल्या दोन दशकांत जग इतके गतिमान झाले आहे, की अनेक जण किंकर्तव्यमूढ अवस्थेत गेले आहेत. बदलाला विरोध हा मानवी स्वभाव. पण बदलला नाहीत तर तुम्हाला बदलले जाईल, तुमची जागा घेणारा दुसरा कोणीतरी येईल आणि अरण्यरुदन हेच तुमचे प्राक्तन उरेल. जगाबरोबर जो बदलेल तो टिकेल. अर्थात हे बदल मूल्यांचे नसावेत; तंत्राचे असावेत, ज्ञानाच्या अद्ययावतीकरणाचे असावेत, यशाच्या नव्या वाटा धुंडाळायला प्रवृत्त करणारे असावेत, जगण्याची लढाई बुलंद करणारे असावेत.**

**नवे वर्ष हे नवेपण लेण्याचे एक निमित्त. ते साधून 'ॲग्रोवन' बदलतो आहे. अर्थात जुनी मूल्ये कायम ठेवून बदलाची दिशा ठरवली आहे. शेतकरी हाच 'ॲग्रोवन'चा केंद्रबिंदू आहे व भविष्यातही असेल. त्याच्याभोवतीच 'ॲग्रोवन'चा शब्दसोहळा रंगेल. या शब्दांना मार्गदर्शनाचा सोस आहेच, त्याचबरोबर वेळप्रसंगी ते विजेचा कल्लोळही घेऊन येतात. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लढताना 'ॲग्रोवन'ने वेळोवेळी हे व्रत घेतले आहे, हे आपण जाणताच. पुढची वाटचाल अशीच राहील. मांडणीतला सोपेपणा, सुटसुटीतपणा हा 'ॲग्रोवन'च्या बदलाचा मूलाधार आहे. वाचकाला गोंधळात टाकणारी मांडणी टाळून त्याला सोप्या भाषेत आणि नेमकेपणाने विषय समजावून सांगणे हा त्यामागचा मूळ उद्देश आहे. गेले साडेचार वर्षांहून अधिक काळ 'ॲग्रोवन' वाचून सजग झालेल्या वाचकाला काही तरी नवे आणि पुढचे हवे आहे. त्याच्या अपेक्षांना साद देणे हेही बदलामागचे एक प्रयोजन आहे. नव्या स्वरूपातील 'ॲग्रोवन'चे आपण स्वागत कराल आणि हे बदल गोड मानून घ्याल हीच अपेक्षा!**

**प्रासंगिक**

# संशोधनाचे नियंत्रण शेतकऱ्यांच्या हाती

शेतकऱ्यांचे ज्ञान, त्यांच्याकडून वापरल्या जाणाऱ्या पद्धती आणि संस्कृती या बाबी गेल्या काही दशकांपासून शास्त्रीय आणि राजकीय छाननीखाली आहेत. तज्ज्ञांकडून अधिकृत मान्यता मिळवण्यासाठी शेतकरी कित्येक वर्षे झगडत आहेत. या पार्श्वभूमीवर डिसेंबरमध्ये कर्नाटकात राबवल्या गेलेल्या 'रयता तीर्पू' (शेतकऱ्याचा निवाडा) या अनोख्या उपक्रमाची निश्‍चितच दखल घ्यावी लागेल.

बेंगळुरू शहरानजीक झालेल्या या कार्यक्रमात कर्नाटक राज्याच्या विविध भागांतील ३० शेतकऱ्यांनी पंचांची भूमिका निभावली आणि चार दिवस विविध शेतकरी आणि लोकांचे म्हणणे ऐकून घेतले. या पंचांमध्ये पुरुषांसोबत महिला शेतकऱ्यांचाही समावेश होता. पाचव्या दिवशी बेंगळुरू शहरातील कृषी तंत्रज्ञान संस्थेमध्ये त्यांनी त्यांचा निवाडा ऐकवला. त्या निवाड्यामध्ये २२ अत्यंत साध्या; पण स्पष्ट मुद्द्यांचा समावेश होता. हे मुद्दे निश्‍चितच विचार करायला लावणारे होते. भारतीय शेतकरी शेतीच्या विचित्र गुंतागुंतीत अडकला असल्याचे त्या चर्चेतील काही मुद्द्यांवरून अधोरेखित झाले. हे शेतकरी पुन्हा पारंपरिक शेतीकडेही वळू शकत नाहीत आणि नव्या शेतीकडे जायचे झाले, तर ती महागडी तंत्रे त्यांना परवडण्यासारखी नाहीत. या समस्येला तोंड देण्यासाठी शेतकऱ्यांना थेट उपयुक्त ठरेल अशा संशोधनाची (प्रो-फार्मर ॲग्रिकल्चरल रिसर्च) गरज आहे, की ज्याच्या अजेंड्यामध्ये संकरित किंवा जनुकीय सुधारित पिकांचा समावेश नसेल, असा मुद्दाही त्यात मांडला गेला. बियाणे आणि जमीन हडपण्याबाबतच्या शेतकरी विरोधी कायद्यांना त्या वेळी विरोध करण्यात आला. प्रत्येक ग्रामपंचायतीत स्थानिक जातींची बियाणे पेढी असायला हवी, अशी निकड या शेतकरी पंचांनी व्यक्त केली.

या उपक्रमामागची प्रक्रिया नेमकी कशी होती, हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल. यात केवळ शेतकऱ्यांचाच नव्हे, तर आणखीही अनेकांचा समावेश होता. सुकाणू समितीने केलेल्या अनेक चर्चांमधून हा कार्यक्रम साकारला गेला. या सुकाणू समितीमध्ये कृषी शास्त्रज्ञ, पत्रकार, कर्नाटक राज्य रयत संघासारख्या शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्था अशा सर्वांचा सहभाग होता. त्यांनी काही उत्कृष्ट आणि अनुभवी शेतकऱ्यांची पंच म्हणून निवड केली, त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना या उपक्रमाबाबतची माहिती दिली. या उपक्रमांतर्गत ज्या वेळी चर्चा सुरू होती, त्या वेळी त्यावर देखरेख



कांची कोहली

ठेवण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या पॅनेलची नियुक्ती करण्यात आली होती. युनिव्हर्सिटी ऑफ ॲग्रिकल्चरल सायन्सेसमधील शास्त्रज्ञ, कर्नाटकच्या कृषी विभागातील सरकारी अधिकारी, पत्रकार, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी, अन्य शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सामोरे गेले.

**गावातील अन्य घटकांचाही समावेश**

शेतकऱ्यांनी केलेल्या या निवाड्यात आणखी एक महत्त्वाची गोष्ट होती, ती म्हणजे शेतकऱ्यांनी केवळ स्वतःचाच विचार केला नव्हता. जैवविविधतेने युक्त असलेल्या आणि पारंपरिक पद्धतीने शेती करत असलेल्या शेतकऱ्यांना गुराखी, धनगर, शेतीची अवजारे तयार करणारे कारागीर, कुंभार यांसारख्या गावातील अन्य घटकांची फार मोठी मदत होत असते. ही बाब लक्षात घेऊन शेतकरी पंचांनी त्यांच्या निवाड्यात असे म्हटले, की शेतीची धोरणे ठरविताना शेतकऱ्यांसोबत या अन्य घटकांचाही त्यामध्ये समावेश असावा आणि ती स्थाननिहाय असावीत.

हैदराबाद येथील डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटी अन्य काही संस्थांच्या सहकार्याने 'अलायन्स फॉर डेमोक्रॅटिसायझिंग ॲग्रिकल्चरल रिसर्च इन साउथ एशिया'(आदर्श) हा उपक्रम राबवत आहे. अमेरिका, ब्रिटन, जर्मनी यांसारख्या प्रगत देशांमध्ये 'जनतेचा निवाडा' ही पद्धत अलीकडे वापरली जाते, त्याचाच आदर्श घेऊन दक्षिण भारतात 'रयता तीर्पू' हा उपक्रम 'आदर्श'च्या माध्यमातून राबवला जातो आहे.

**'रयता तीर्पू' चा आदर्श मार्ग**

कर्नाटकातील शेतकरी (प्रामुख्याने महिला), दलित आणि आदिवासी यांना एका व्यासपीठावर आणून सध्याच्या कृषी संशोधनाचे नेमके काय फायदे आहेत याची तपासणी करणे, असा त्यामागचा हेतू आहे. शेतकरी, शेतकरी संघटना, शास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्था, शिक्षणतज्ज्ञ आणि माध्यमे यांची एकत्र मोट त्यासाठी बांधली जात आहे. कृषी संशोधनाचे नियंत्रण संस्थागत आराखड्यात अडकले आहे, ते पुन्हा शेतकऱ्यांच्या हाती सोपविणे, हा त्यामागचा उद्देश आहे. शेतकऱ्यांच्या संशोधनाला विरोध करणारे शास्त्रज्ञ, केवळ स्वतःच्या फायद्याचा विचार करणाऱ्या बियाणे कंपन्या आणि शेतकऱ्यांच्या ज्ञानाकडे दुर्लक्ष करणारे सरकार अशा सर्वांनीच 'रयता तीर्पू' या आदर्श मार्गावरून वाटचाल करायला हवी, त्यातून सध्याच्या कृषी संशोधनाची परिस्थिती सुधारू शकते.

या उपक्रमाबाबत अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : http://www.raitateerpu.com/adarsa.html

**शब्दांकन : अनिकेत कोनकर**
**(लेखिका कल्पवृक्ष या दिल्लीस्थित स्वयंसेवी संस्थेत कार्यरत आहेत.)**


## ऊसदराचा प्रश्न



आज उसाचा दर साखर महासंघ आणि विविध कारखान्यांचे अध्यक्ष एकत्रितपणे ठरवितात. त्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होतो. सध्या महागाईच्या काळात उसाच्या बेण्याचे वाढलेले भाव, रासायनिक खतांचे वाढते दर लक्षात घेता उसाचा दर अतिशय कमी वाटतो. शिवाय मजुरांची वरचेवर भासणारी टंचाई आणि मोलमजुरीच्या दरात झालेली वाढ ही गोष्टही उसाचा दर ठरविताना लक्षात घ्यायला हवी. उसाचा दर किमान दहा वर्षे सारखा राहील यादृष्टीने कापूस खरेदीच्या पार्श्वभूमीवर उसाचीही खरेदी व्हायला हवी. शेतकरी कर्जबाजारी होण्याचे प्रमाण त्यामुळे नक्कीच कमी होईल.

**बी. एन. नवपुते,** विहामांडवा, ता. पैठण

## महावितरणचा कारभार



सहा नोव्हेंबरला महावितरणकडून वीज बिल आले आणि अंगावर शहारेच आले. मीटरच्या बिलावरील छायाचित्रात रीडिंग होते ५०३६ व छापले होते ५१३६. म्हणजे १०० युनिटचा फरक. सर्वसामान्य कुटुंब असल्यामुळे ५६० रुपये बिल भरणे अशक्य म्हणून स्थानिक कार्यालयात तक्रार घेऊन गेल्यावर कोल्हापूरच्या कार्यालयात जाण्यास सांगितले. गावापासूनचे कोल्हापूर हे अंतर ३०-३५ किलोमीटर आहे. त्यामुळे नक्कीच ग्राहकाचे १०० रुपये खर्च होणार. त्यापेक्षा वाढीव बिल भरण्याचे सोईस्कर, असा विचार करू लागलो आहे. अशा या कारभारामुळे विजग्राहकांचेच नुकसान होत आहे. तरी महावितरणच्या कारभारात सुधारणा कधी होणार?

**विष्णू वजार्डे,** दिगवडे (जि. कोल्हापूर

**प्रतिसाद**

## धान्यापासून मद्यनिर्मितीस विरोध नको

विदर्भ व मराठवाड्यामध्ये ज्वारी, बाजरी, कापूस, तूर यांचे उत्पादन घेतले जाते. या अन्नधान्यावर प्रक्रिया उद्योग नसल्यामुळे व बाजारपेठेमध्ये मागणी नसल्यामुळे उत्पादन खर्च जास्त अन् उत्पन्न कमी मिळत असे. त्यातच शासनाचे धोरण मारक असल्यामुळे शेतकरी कर्जामध्ये बुडाला. घरगुती खर्च, सावकाराचा तगादा, नापिकी, नैसर्गिक आपत्ती इत्यादी कारणांमुळे आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाला. विदर्भात व मराठवाड्यात मुख्यत्वे उत्पादित होणाऱ्या अन्नधान्यावर प्रक्रिया करून अल्कोहोल निर्मिती करणाऱ्या कारखान्यांना शासनाने परवानगी दिली. पण ज्वारी, बाजरी, मका या पिकांचा अन्नधान्याचा मद्यनिर्मितीसाठी वापर केल्यास धान्याचा तुटवडा होईल, अन्नधान्यांचे दर वाढतील, जनतेला उपासमारीची वेळ येईल, अशा प्रकारच्या अफवांचा प्रसार करून काहींनी शासनावर दबाव तंत्राचा वापर करण्यास सुरवात केली आहे.

पश्‍चिम महाराष्ट्रामध्ये ऊस या पिकावर आधारित प्रक्रिया उद्योग, कारखाने मोठ्या प्रमाणात नाहीत काय? उसापासून कारखान्यातून फक्त साखर निर्माण होते काय? उर्वरित उसाच्या चोथ्याला प्रक्रिया करून अल्कोहोलची निर्मिती होत नाही काय? अल्कोहोलची निर्मिती पश्‍चिम महाराष्ट्रामध्ये होते याचा अर्थ असा समजावा का, की पश्‍चिम महाराष्ट्राची जनता मद्याच्या आहारी गेली अन् व्यसनी झाली आहे! तेव्हा या प्रकल्पांना विरोध करून शेतकऱ्यांवर अन्याय करू नये.


**विष्णू रामराव तायवाडे,** गोधनी रोड, टाकळी, नागपूर

## ...तरच परवानगी द्यावी

राज्य शासनाने धान्यापासून मद्यनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पांना सवलत देण्याची घोषणा केली आहे; मात्र धान्यापासून मद्यनिर्मितीची संकल्पना पुरोगामी महाराष्ट्रामध्ये रुचणारी नाही. हजारो लोक अर्धपोटी जीवन जगत असताना सरकारच्या डोक्यात हा विचार आला तरी कसा, असा प्रश्न पडतो. आज तृणधान्याला म्हणावा तेवढा भाव नाही. अगदी कवडीमोल दराने तो विकला जातो. शेतकऱ्याला असे धान्य पिकवणेही परवडत नाही. कमी भावामुळे अशा धान्याचे क्षेत्रही घटत आहे. सरकारने धान्यापासून मद्यनिर्मिती प्रकल्पाचा निर्णय घेतला आहे; परंतु लोकांना खायला धान्य मिळणार का, हा विचार पहिला करावा लागेल. जर या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या धान्याला हमीभाव मिळत असेल, लोकांना खायला पुरेसे धान्य मिळत असेल, तर सहकारी साखर कारखान्याप्रमाणे असे प्रकल्प सहकारी तत्त्वावर सुरू करण्यास परवानगी द्यावी, अन्यथा देऊ नये.

**– तु. रा. माळकर,** मु.पो. उंदरगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर

## जंगल वाचवा



जंगले वाचली नाहीत तर कुणीही जगणार नाही. जंगलांमुळे संपूर्ण जीवनचक्र चालत असते. दिवसेंदिवस जंगलांचे प्रमाण कमी होत आहे, ही एक गंभीर बाब आहे. जंगले कमी झाल्यामुळे पाऊस पडण्याचे प्रमाणसुद्धा कमी झाले आहे. वन्यजीव संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहेत. सध्या विदर्भात जंगलांचे प्रमाण ३३ टक्क्यांपेक्षा कमी आहे. पाऊस कमी पडल्यामुळे साथीचे रोग वाढत आहेत. म्हणून प्रत्येकाने जंगलांचे जतन करून पावसाचे प्रमाण वाढविण्यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे.

**मेघराज काळे,** चंद्रपूर

■ **वर्ष : ५, अंक : २५३** मुद्रक व प्रकाशक : **श्री. अभिजित प्रताप पवार** ■ **मुख्य संपादक : उत्तम मारुती कांबळे** ■* **कार्यकारी संपादक : आदिनाथ दत्तात्रय चव्हाण** (*पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी) ■ हे दैनिक सकाळ पेपर्स लिमिटेडसाठी मुद्रक आणि प्रकाशक श्री. अभिजित प्रताप पवार यांनी १) सकाळ प्रिंटिंग प्रेस, स. क्र. १५९/१६०, पुणे-सासवड रोड, लक्ष्मण वजन काट्यामागे, उरुळी देवाची, पुणे - ४१२३०८, २) सकाळ प्रिंटिंग प्रेस, प्लॉट नं. ४२ बी, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४. ३) सकाळ प्रिंटिंग प्रेस, डी-४, एम.आय.डी.सी., शिरोली, कोल्हापूर - ४१६ १२२, ४) सकाळ पेपर्स लिमिटेड - द्वारा, विकास इलेक्ट्रिकल्स अँड सिरॅमिक प्रॉडक्ट्स प्रा. लि., प्लॉट ३२, एम.आय.डी.सी., सातपूर - त्र्यंबक रोड, नाशिक - ४२२ ००३, ५) सकाळ पेपर्स लिमिटेड, प्लॉट नं. सी - ३, एम.आय.डी.सी. एरिया, टेलिफोन एक्स्चेंज जवळ, औरंगाबाद रोड, जळगाव - ४२५ ००३, ६) सकाळ पेपर्स लिमिटेड, डी - ३५, ॲडिशनल एम.आय.डी.सी. एरिया, आय.टी.आय.जवळ, जालना - ४३१ २३०, ७) सकाळ पेपर्स लिमिटेड, प्लॉट नं. ए - १९/३, एम.आय.डी.सी., चिंचोली, सोलापूर - ४१३ २५५, ८) सकाळ पेपर्स लिमिटेड, बी - ३२/३३, एम.आय.डी.सी., हिंगणा, नागपूर - ४४० ०१६ येथे मुद्रित केले व सकाळ पेपर्स लिमिटेड, ५९५, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रकाशित केले. ■ **'ॲग्रोवन'मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत.**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
ॲग्रोवन, सकाळ पेपर्स लि. ५९५, बुधवार पेठ, पुणे - ४११००२
■ दूरध्वनी : ०२०/२४४०५५००/ ६६०३५५०० ■ फॅक्स : २४४०५७५८
■ e-mail : agrowon@esakal.com